# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

क्र.नि.वि./आयसीडी /२०२३-२४/**१०४६.**
२९ नोव्हेबर, २०२३.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(घ) मधील तरतुदीनुसार अभ्यासमंडळ त्यांच्या सदस्यांमधून एका सदस्याची अध्यक्ष पदाची निवडणूका

## निवडणूक सुचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(घ) नुसार अभ्यासमंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडून द्यावयाचा सदस्य हा, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी मान्यता मिळालेला व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा अध्यापक असेल. निवडणूकीसाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र ९ (२) नुसार ही निवडणूक सुचना देत आहे.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(घ) नुसार पुढील अभ्यासमंडळांची पहिली बैठक दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी वेळ सकाळी ११.०० वा. दिक्षांत सभागृह, मुंबई, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली आहे.**

**परिशिष्ठ “A”**

| अ. क्र. | विद्याशाखा | विषय |
|---|---|---|
| १ | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा – Science & Technology | रसायनशास्त्र – Chemistry |
| २ | | गणित – Mathematics |
| ३ | | भौतिक शास्त्र – Physics |
| ४ | | यंत्र अभियांत्रिकी – Mechanical Engineering |
| ५ | | स्थापत्य अभियांत्रिकी – Civil Engineering |
| ६ | | वनस्पती शास्त्र – Botany |
| ७ | | विद्युत अभियांत्रिकी – Electrical Engineering |
| ८ | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा – Commerce & Management | लेखा शास्त्र – Accountancy |
| ९ | | वाणिज्य – Commerce |
| १० | मानवविज्ञान विद्याशाखा – Humanities | इतिहास – History |
| ११ | | मराठी – Marathi |
| १२ | | हिंदी – Hindi |
| १३ | | अर्थशास्त्र – Economics |
| १४ | | ग्रामिण विकास – Rural Development |
| १५ | | राज्यशास्त्र – Politics |
| १६ | | तत्वज्ञान – Philosophy |
| १७ | | मानसशास्त्र – Psychology |
| १८ | | इंग्रजी – English |
| १९ | आंरतविद्याशाखीय विद्याशाखा — Inter-Disciplinary Studies | भुगोल – Geography |

....२/-

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(घ) नुसार पुढील अभ्यासमंडळांची पहिली बैठक दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी वेळ दुपारी ०३.०० वा. दिक्षांत सभागृह, मुंबई, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली आहे.

परिशिष्ठ "B"

| अ. क्र. | विद्याशाखा | विषय |
|---|---|---|
| १ | विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा – Science & Technology | सूक्ष्मजीवशास्त्र – Microbiology |
| २ | | प्राणीशास्त्र – Zoology |
| ३ | | जैव-रसायनशास्त्र – Bio-Chemistry |
| ४ | वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा – Commerce & Management | व्यवसाय व्यवस्थापन – Business Management |
| ५ | | व्यवसाय अर्थशास्त्र – Business Economics |
| ६ | मानवविज्ञान विद्याशाखा – Humanities | संख्याशास्त्र – Statistics |
| ७ | | समाजशास्त्र – Sociology |
| ८ | | संस्कृत, पाली आणि प्राकृत – Sanskrit, Pali & Prakrit |
| ९ | | गुजराती – Gujarati |
| १० | | कन्नडा – Kannada |
| ११ | | पर्शियन, अरेबिक व इस्लामिक संस्कृती – Persian, Arabic, Islamic Culture |
| १२ | | लॅटिन, ग्रीक व आधुनिक युरोपियन भाषा – Latin, Greek & Modern European Languages |
| १३ | | उर्दु – Urdu |
| १४ | | सिंधी – Sindhi |
| १५ | आंरतविद्याशाखीय विद्याशाखा — Inter-Disciplinary Studies | शिक्षणशास्त्र – Education |
| १६ | | विधी – Law |
| १७ | | भूशास्त्र – Geology |
| १८ | | समाजकार्य – Social Work |
| १९ | | रंग आणि उपयोजित कला – Painting & Applied Arts |

**अभ्यासमंडळाच्या बैठकीतील निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे:**

| अनु. क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | उमेद्वारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (सन२०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १०(२)(क)नुसार निवडणूकीच्या दिनांकाच्या पूर्ण १० दिवस अगोदर) | ०५ डिसेंबर,२०२३ मंगळवार संध्या. ०४.०० वा. | निवडणूक विभाग, कक्ष क्र. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. |
| २ | उमेदवारी अर्जाच्या छाननीच्या दिनांक, वार व वेळ | ०६ डिसेंबर, २०२३ बुधवार दुपारी १२.०० वा. | फिरोजशहा मेहता सभागृह (व्यवस्थापन परिषदेचे दालन), मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. १०५, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १ मधील मुद्दा क्र. १०(५) नुसार | ०८ डिसेंबर, २०२३ शुक्रवार संध्या. ५.०० वा. पर्यंत | निवडणूक विभाग, कक्ष क्र. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. |
| ४ | मतदान आणि मतमोजणी दिनांक, वार व वेळ | २० डिसेंबर, २०२३ बुधवार निवडणूकीनंतर अर्धा तासाने | दिक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. |

१. **शासन आदेश क्र. संकीर्ण-२०१६/(३४७/१६)/विशि.३, दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

(क) पी.एच.डी. पदवीधारक असावा,

(ख) एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,

(ग) पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अध्यापन करणारा मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,

(घ) मान्यताप्राप्त पी.एच.डी. मार्गदर्शक असावा ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पी.एच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल,

(ङ) किमान दोन पाठयपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मुळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्स मध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावे,

(च) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

(नामनिर्देशन अर्जासोबत वरील स्वय:साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.)

....४/-

## २. <u>अभ्यासमंडळाच्या सदस्यामधून एका सदस्याची अध्यक्ष म्हणून निवड करण्यासाठी</u>

१ विहित नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध आहेत.

२ नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्त्या मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करून व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणूकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वत:च्या नामनिर्देशनामध्ये एकतर सुचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वत: सुचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(३)).

३ या निवडणूक सूचनेमध्ये नमुद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(४)).

४ उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकास विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तीश: किंवा त्याने लिखित स्वरूपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(५)).

५ नामनिर्देशन पत्राच्या वैधतेच्या संदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास, कुलगुरूंकडे, अपिल करता येईल आणि मा.कुलगुरुंचा निर्णय अंतिम असेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(७)).

६ उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागापेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणूकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल.(एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १० (८)).

७ उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८ महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेली परिपत्रके/पत्र यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणा-या उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज ग्राहय धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राहयतेसंबंधीच्या नियमांबाबतची प्रत विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध आहेत.

....५/-

९ उमेदवारी अर्जासोबत वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीत नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरीता ग्राह्य धरली जाणार नाहीत).

१० उमेदवारी अर्ज छाननीच्यावेळी स्वत: उमेदवार किंवा त्यांने लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ति प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.(एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १०(६)).

११ **<u>बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३</u> रोजी दिक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, येथे होणाऱ्या अभ्यासमंडळाच्या बैठकीत संबंधीत मतदारांनी मतदान करावयाचे आहे.**

१२ **मतदान करण्यास पात्र असलेल्या सदस्यांची यादी सोबत जोडल्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे. तथापि, रिक्त असलेल्या सदस्यांमध्ये नवीन सदस्यांचा (नामनिर्देशित सदस्य) समावेश झाल्यास सदर यादी मतदानापुर्वी अद्ययावत करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

१३ मतदानास येताना मतदारांनी स्वत:चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधाकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहीत ओळखपत्र किंवा आयकर अधिकाऱ्यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहीत ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहीत ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **<u>संबंधित सभासदास / मतदारास ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही</u>**.

१४ ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधन्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

**स्वाक्षरीत/-**
**(प्रा. एस.जी. भिरूड)**
**कुलसचिव**
**तथा निवडणूक निर्णय अधिकारी**